कामगार उप आयुक्त (गट-अ) या पदावर
तात्पुरती पदोन्नती देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, उर्जा व कामगार विभाग**
**शासन आदेश क्रमांकः पदोन्न-२०२२/प्र.क्र.२२८/कामगार-८**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: २१ जुलै, २०२३

वाचा :

१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/का-१२, दि.०१.०८.२०१९

२.शासनाचे आदेश क्रमांक अतिका-२०२३/प्र.क्र.२३/काम-८, दि.१७.७.२०२३ चे आदेश

**शासन आदेश:**

शासनाच्या दि.१४.०३.२०२३ रोजीच्या आदेशान्वये सहायक कामगार आयुक्त संवर्गातील श्री. अ.द.गुरव व श्री.सु.म. गायकवाड यांना सन २०२२-२३ या निवडसूची वर्षात कामगार उप आयुक्त, गट अ या संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे. यापैकी, श्री. सु.म.गायकवाड यांनी पदोन्नती नाकारल्यांमुळे उपलब्ध झालेल्या एका रिक्त पदावर तात्पुरती पदोन्नती देण्यासाठीचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करण्यात आला होता. सामान्य प्रशासन विभागाने काही अटी व शर्तींच्या अधीन राहून सदर पूरक नियमित निवडसूचीस मान्यता दिली आहे.

२. सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन खालील रकान्यात नमूद केल्याप्रमाणे श्री. रा.आ.आडे यांना कामगार उप आयुक्त, गट-अ या संवर्गात या शासन आदेशान्वये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असून पदोन्नतीनंतर त्यांना स्तंभ क्रं. ५ दर्शविलेल्या ठिकाणी पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र | ज्येष्ठता क्रमांक | अधिकाऱ्यांचे नाव ,पदनाम | प्रवर्ग | पदोन्नतीनंतरची पदस्थापना / कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | ५ | श्री. रा. भा. आडे, सहायक कामगार आयुक्त | वि. जा./अ | अध्यक्ष, किराणा बाजार व दुकाने मंडळ, मुंबई |

३. मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधिन राहून सदर संवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार आणि सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०७.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदर तात्पुरत्या पदोन्नतीस मान्यता देण्यात येत आहे.

४. शासनाच्या वाचा क्र.२ येथील आदेशान्वये श्री. आडे यांचेकडे अध्यक्ष, किराणा बाजार व दुकाने मंडळ, मुंबई या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता. सदर आदेश आता

अधिक्रमित होतील. श्री. आडे यांनी पदोन्नतीच्या पदावर तातडीन रुजू होऊन तसा रुजू अहवाल कामगार आयुक्त यांच्यामार्फत शासनास सादर करावा.

५. पदोन्नती नाकारल्यास सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१२.०९.२०१६ च्या शासन निर्णयानुसार संबंधितावर कार्यवाही करण्यात येईल. तसेच त्यांनी अनधिकृतपणे रजेवर जाऊ नये. तसेच पदस्थापना रद्द अथवा त्यात बदल करणेसाठी कोणत्याही स्वरुपाचे आवेदन सादर करु नये. तसे केल्यास सदर अधिकारी शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरतील, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

६. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली,२०२१ मधील २ (ड) मधील तरतुदीनुसार पदोन्नतीने नियुक्ती होणा-या अधिका-यांनी सदर आदेश निघाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या विहित मुदतीमध्ये रुजु होणे आवश्यक आहे. सदर मुदतीत रुजु न झाल्यास संबंधित अधिका-याचा अनुपस्थितीचा कालावधी अकार्यदिन ( dias non) म्हणून गणला जाईल, याची देखील संबंधितांनी नोंद घ्यावी.

७. सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने, निवडसूचीतील अधिका-यास नियमितपणाचा कोणताही हक्क मिळणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०७२११७१६१९८४१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DEEPAK
UTTAMRAO
POKALE

Digitally signed by DEEPAK UTTAMRAO POKALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=856b31c793b12e4f22cb247c5cff7f3358867f2482aa2234f6131bf8940dbd2e, pseudonym=8D691A3CD19CB6007E6D3E2D34F900540C2F2E00, serialNumber=F4163205E7B4960CC7CA6F973D6DEB06502B2E8FC47A411BABCF42A0E99CF34B, cn=DEEPAK UTTAMRAO POKALE
Date: 2023.07.21 17:18:32 +05'30'

**( दिपक पोकळे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१.मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२.मा. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
३.कामगार आयुक्त, कामगार भवन, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१
४.अपर कामगार आयुक्त, कोकण
५.महालेखापाल कार्यालय (ले. व अ.)/(ले.प.), मुंबई-१
६.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
७.संबंधित पदोन्नत अधिकारी (कामगार आयुक्त यांचेमार्फत)
८. निवड नस्ती (कामगार-८).